गुरुवार, 4 जून, 2015

दैनिक भास्कर

### हिंदी विवि में मराठी के अध्ययन का शुभारंभ

# एम.ए मराठी पत्रकारिता और अनुवाद के पाठ्यक्रम प्रारंभ

ब्यूरो|वर्धा.

महात्मा गांधी अंतरराष्ट्रीय हिंदी विवि वर्धा में अब हिंदी के साथ-साथ मराठी माध्यम से भी पढ़ाई होगी। इससे संबंधित महत्वपूर्ण निर्णय कुलपति प्रो.गिरीश्वर मिश्र की पहल पर लिया गया है।

वर्तमान अकादमिक सत्र 2015-16 में एम.ए मराठी तथा तुलनात्मक साहित्य, पत्रकारिता में डिप्लोमा हिंदी एवं मराठी तथा मराठी एवं हिंदी में अनुवाद का स्नातकोत्तर डिप्लोमा आदि पाठ्यक्रम अब मराठी माध्यम से भी पढ़ाए जाएंगे। विवि के कुलपति प्रो.गिरीश्वर मिश्र से संपर्क करने पर उन्होंने कहा कि महाराष्ट्र का एकमात्र अंतरराष्ट्रीय केंद्रीय विवि वर्धा में स्थित है और यहां पर मराठी भाषा की पृष्ठभूमि सो छात्रों की आवश्यकता को ध्यान में रखते हुए यह जरूरी है कि उनके लिए मराठी भाषा के माध्यम से भी पाठ्यक्रम तैयार कर चलाए जाए ताकि उनके लिए रोजगार के रास्ते खुल सके। एम.ए मराठी पाठ्यक्रमके लिए किसी भी अनुशासन में स्नातक विद्यार्थी प्रवेश ले सकते है। तथा पत्रकारिता में डिप्लोमा एवं मराठी-हिंदी अनुवाद में पीजी डिप्लोमा पाठ्यक्रमों में किसी भी अनुशासन में स्नातक उत्तीर्ण विद्यार्थी प्रवेश ले सकते है। प्रवेश की अंतिम तिथि 30 जून रखी गई है। तथा आवेदन विवि के अकादमिक विभाग से सभी कार्यदिवसों में प्राप्त किए जा सकते है। आवेदन पत्र विवि की वेबसाइट डब्ल्यू डब्ल्यू डब्ल्यू.हिंदीविश्व.ओ आर जी से भी डाउनलोड कर भरे जा सकते है। उक्त पाठ्यक्रमों में प्रवेश लेने की अपील विवि प्रशासन द्वारा की गई है।

देशोन्नती
/गुरुवार, दि ४ जून २०१५

# हिंदी विश्वविलयात मराठी अध्ययनाचा शुभारंभ

## एम. ए. मराठी, पत्रकारिता आणि अनुवादचे नवे अभ्यासक्रम सुरू

*प्रतिनिधी/३ जून*

**वर्धा** : महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विश्वविद्यालयात आता हिंदी सोबतच मराठी माध्यातून शिकण्याची सोय उपलब्ध होणार आहे. या संबंधीचा महत्वपूर्ण निर्णय कुलगुरु प्रो. गिरीश्वर मिश्र यांच्या पुढाकाराने घेण्यात आला आहे.

वर्तमान अकादमिक सत्र २०१५-१६ पासून एम. ए. मराठी आणि तुलनात्मक साहित्यद, पत्रकारितेत डिप्लोक्मा (हिंदी आणि मराठी) तसेच मराठी आणि हिंदीमध्ये भाषांतराचा पदव्युत्तवर डिप्लोमा हे अभ्यासक्रम आता मराठी माध्यमातून शिकविले जाणार आहेत.


याविषयी विश्व विद्यालयाचे कुलगुरु प्रो. गिरीश्वठर मिश्र यांच्याशी संपर्क केला असता ते म्हयणाले की महाराष्ट्रातील एकमेव आंतरराष्ट्रीय केंद्रीय विश्वशविद्यालय वर्धेत आहे आणि या ठिकाणी मराठी भाषेतून शिकणारे अधिक संख्येने विद्यार्थी आहेत. त्याची आवश्यकता लक्षात घेवून त्यांरच्यादकरिता मराठी भाषेतून अभ्यासक्रम चालविण्यायचा निर्णय विश्वाविद्यालयाकडून घेण्यात आला आहे. जेणेकरून त्यांच्याकरिता रोजगाराचे मार्ग तयार होतील. एम. ए. मराठीकरिता पदवी झालेले विद्यार्थी प्रवेश घेवू शकतील तर पत्रकारिता आणि भाषांतर विषयात पदव्यूत्तार डिप्लोमा मध्ये पदवी झालेले विद्यार्थी प्रवेश घेवू शकतील. प्रवेश घेण्याची शेवटची तारीख ३० जून असून अर्ज अकादमिक विभागात मिळतील. डाउनलोड करून भरण्याची सोय ही उपलब्ध करण्यात आली आहे.

सकाळ
३ जून २०१५

## मराठी अध्ययनाचा पारंभ

**वर्धा, ता. २ :** महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विश्वविद्यालयात आता हिंदी सोबतच मराठी माध्यमातून शिकण्याची सोय उपलब्ध होणार आहे. या संबंधीचा निर्णय कुलगुरू प्रा. गिरीश्वर मिश्र यांच्या पुढाकाराने घेण्यात आला आहे. वर्तमान अकादमिक सत्र २०१५-१६ पासून एम. ए. मराठी, तुलनात्मक साहित्य, पत्रकारितेत डिप्लोमा (हिंदी आणि मराठी) तसेच मराठी आणि हिंदीमध्ये भाषांतराचा पदव्युत्तर डिप्लोमा हे अभ्यासक्रम आता मराठी माध्यमातून शिकविले जाणार आहेत. याविषयी विश्वविद्यालयाचे कुलगुरू प्रा. गिरीश्वर मिश्र यांच्याशी संपर्क केला असता ते म्हणाले, महाराष्ट्रातील एकमेव आंतरराष्ट्रीय केंद्रीय विश्वविद्यालय वर्धेत आहे आणि या ठिकाणी मराठी भाषेतून शिकणारे अधिक विद्यार्थी आहेत.

सकाळ
४ जून २०१५



# हिंदी विश्वविद्यालयात विदेशी भाषा शिकण्याची संधी

**जग हे एक खेडे झाले आहे, ही संकल्पना आल्यावर जगातील तमाम देशांमधील अंतर तर कमी झाले; परंतु भाषा आजसुद्धा देशा-देशांमधील संवादात अडसर किंवा दरी बनत आहे. विविध भाषांच्या विस्ताराशिवाय देश एकमेकांजवळ येतील ही कल्पनाच अस्तित्वात येणे शक्य नाही. हे लक्षात घेता स्थानिक महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विश्वविद्यालयाने अध्ययन आणि अध्यापनाच्या आपल्या कक्षा रुंदावत विदेशी भाषा अध्ययन केंद्र सुरू केले आहे. केंद्राचे नाव भारतीय आणि विदेशी भाषा प्रगत अध्ययन केंद्र असे आहे.**

**बी. एस. मिरगे**

भाषा ही संवादाची महत्त्वाची वाहिनी आहे. त्यामुळे आजच्या युवकांना आपल्या परंपरागत विषयाशिवाय कमीत कमी एक विदेशी भाषा शिकणे आवश्यक आहे. द्विपक्षीय संबंध प्रगढ करण्यासाठी आणि देशा-देशांमधील संवाद कायम करण्यासाठी विदेशी भाषा हे एक रोजगाराचे साधन बनू शकते, ही भावना आता युवकांच्या मनात जागृत झाली आहे. देशा-देशांमध्ये आदान प्रदानाचे व्यवहार वाढल्याने रोजगाराचे अनेक क्षेत्र खुले झालेत आणि होत आहेत. हे लक्षात घेता वर्धेतील महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विश्वविद्यालयाने अध्ययन आणि अध्यापनाच्या आपल्या कक्षा रुंदावत विदेशी भाषा अध्ययन केंद्र सुरू केले आहे. केंद्राचे नाव भारतीय आणि विदेशी भाषा प्रगत अध्ययन केंद्र, असे आहे. विदेशी आणि भारतीय भाषांमध्ये संवाद, अनुवाद आणि ज्ञान-विज्ञानाचे आदान-प्रदान करणे हा या केंद्राचा मुख्य उद्देश आहे. या केंद्राच्या वतीने चीनी, फ्रेंच, जापानी आणि स्पॅनिश या महत्त्वाच्या चार भाषांचे अभ्यासक्रम सुरू केले आहेत. तर मराठी, उर्दू, संस्कृत आणि इंग्रजी या भाषांमध्ये शिकण्याची सोय येथे आहे. आपण इंजिनिअर, पत्रकार, भाषाविद, भाषावैज्ञानिक, चिकित्सक किंवा अन्य कोणत्याही क्षेत्रात असाल तर यापैकी एक भाषा जरी आपणास अवगत असेल तर त्याचा विस्तार आपण आपले व्यक्तिमत्त्व विकसित करण्यासोबतच रोजगार आणि व्यवसाय यासाठी नक्कीच करू शकतो. व्यक्तिमत्त्व विकास, रोजगार आणि भाषा प्रभुत्व या त्रिवेणीतून अनेक गोष्टींची पूर्तता करता येणे शक्य आहे. रोजगाराशिवाय व्यवसायाकरिता या भाषा महत्त्वाच्या साधन ठरू पाहात आहेत.

हे केंद्र अत्याधुनिक सुविधांनी युक्त आहे. भाषा शिकण्याकरिता लागणारी आधुनिक भाषा प्रयोगशाळा, आयसीटी कक्ष आणि कॉम्प्युटर प्रयोगशाळा केंद्रात उपलब्ध आहे. केंद्राच्या वतीने सर्टिफिकेट, डिप्लोमा, एम. फ़िल. आदी अभ्यासक्रम येथे आहेत. विद्यार्थ्यांना एक डिग्री कोर्स करत असताना एक डिप्लोमा किंवा एक सर्टिफिकेट कोर्स करता येतो. त्यामुळे एम. ए. करणारा विद्यार्थी विदेशी भाषेत कोणताही कोर्स सहजरीत्या करू शकतो, हे येथील महत्त्वाचे वैशिष्ट्ये आहे.

**वर्धा**